

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

(स्वायत्त) कोल्हापूर

## इतिहास विभाग

## सूचना

१५/०९/२०२५

महाविद्यालयातील यु.जी. व पी.जी. इतिहास विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, इतिहास विभागातर्फे शनिवार दिनांक २०/०९/२०२५ रोजी सकाळी ठीक ९.१५ वाजता "जागतिक वारसा स्थळातील १२ किल्ले" या विषयावर भित्तीपत्रिकेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपापल्या भित्तीपत्रिका प्रा. अश्विनी खवळे यांच्याकडे दिनांक १८/०९/२०२५ पर्यंत सादर कराव्यात. निर्धारित तारखेपर्यंत भित्तीपत्रिका सादर करणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांनी वेळेवर उपस्थित राहून या शैक्षणिक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा.

डॉ. एस.आर. कट्टीमनी

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर**
**(अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

# इतिहास विभाग

## अहवाल : भित्तीपत्रिका सादरीकरण

२२/९/२०२५

महाविद्यालयातील इतिहास विभागामार्फत "जागतिक वारसा स्थळातील १२ किल्ले" या विषयावर भित्तीपत्रिका सादरीकरण कार्यक्रम शुक्रवार दिनांक २०/०९/२०२५ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य आर. आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात विद्यार्थ्यांनी इतिहासाचे जतन व संवर्धन करण्यासाठी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध किल्ल्यांवर आधारित आकर्षक, माहितीपूर्ण व सर्जनशील भित्तीपत्रिका सादर केल्या. प्रत्येक भित्तीपत्रिकेत संबंधित किल्ल्याचा इतिहास, स्थापत्य वैशिष्ट्ये, बांधकामाची पद्धत, वापरलेले साहित्य, संरक्षण व्यवस्था, जलव्यवस्थापन प्रणाली तसेच त्या किल्ल्याचे राजकीय व लष्करी महत्त्व यांचे सविस्तर व अभ्यासपूर्ण चित्रण करण्यात आले. काही विद्यार्थ्यांनी किल्ल्यांचे नकाशे, छायाचित्रे व कालानुक्रमिक माहितीही सादर करून विषय अधिक स्पष्ट केला. भित्तीपत्रिकांमधील मांडणी, रंगसंगती व माहितीचे सुसूत्र सादरीकरण यामुळे कार्यक्रम अधिक आकर्षक व प्रभावी ठरला. इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी "जागतिक वारसा स्थळातील किल्ल्यांचे महत्त्व" या विषयावर मार्गदर्शन करताना किल्ले हे केवळ युद्धाचे साधन नसून ते आपल्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक असल्याचे सांगितले. त्यांनी किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाची गरज अधोरेखित केली.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी १२ किल्ल्यांची सविस्तर माहिती उपलब्ध व्हावी यासाठी QR कोडची निर्मिती केली होती. या QR कोडच्या माध्यमातून किल्ल्यांविषयीची विस्तृत माहिती, छायाचित्रे व ऐतिहासिक संदर्भ सहज उपलब्ध करून देण्यात आले, ज्यामुळे कार्यक्रम अधिक आधुनिक व उपयुक्त ठरला. डॉ. अनिल जांभळे यांनी आभार प्रदर्शन करताना सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, ज्ञानवर्धक व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. अशा प्रकारे हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व सर्जनशील विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरला.

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# भित्तिपत्रिका- २० सप्टेंबर,२०२५

## जागतिक वारसा स्थळातील १२ किल्ले













शिक्षण महर्षी डॉ.बापूजी साळुंखे
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे
विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर
इतिहास विभाग
भित्तीपत्रिका प्रदर्शन
२० सप्टेंबर २०२५


मराठ्यांच्या नौदलशक्तीचे प्रतिक - खांदेरी
सुवर्णदुर्ग
जिंजी


जागतिक वारसा स्थळातील १२ किल्ले